| MHAK070002302025 | **<u>फौ.कि.अर्ज क्र. २०/२०२५ मधील निशाणी ३ वरील आदेश</u>**<br>वर्षा राजपुत वि. शैलेन्द्रसिंह राजपुत व इतर<br>(दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५) |
|---|---|

१. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला दरमहा रु. १०,०००/– अंतरिम पोटगी, राहण्याची व्यवस्था किंवा घरभाडे दरमहा रु. ५,०००/– मिळण्याचा आदेश व अर्जदारचे स्त्रीधन, लग्नातील आंदण आणि भेटवस्तु तिला परत होण्याचा आदेश करण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक २७.०४.२००३ रोजी राजपुतपुरा, बाळापुर, ता. बाळापुर, जि. अकोला येथे हिंदु रितीरिवाजानुसार झाले. अर्जदारचे आई वडीलांनी सदर लग्नाचा, आंदन व इतर असा एकुण रु. ४,००,०००/– चा खर्च केला. अर्जदार हिचे आई वडीलांनी लग्नामध्ये दिलेले संसारपयोगी साहित्य गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे. गैरअर्जदार क्र. २ सासरे, गैरअर्जदार क्र. ३ सासु, गैरअर्जदार क्र. ४ दिर, गैरअर्जदार क्र. ५ दिरानी, गैरअर्जदार क्र. ६ व ७ ननंदा आहेत. अर्जदार हिचे आई वडीलांनी लग्नामध्ये दिलेले सोन्या–चांदीचे दागीने व संसारपयोगी साहित्य गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदार क्र. १ च्या एकत्रित कुटुंबात हनुमान नगर, रासुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे नांदायला गेली. गैरअर्जदारांनी काही दिवस अर्जदार हिला चांगली वागणुक दिली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला "तु मला पसंत नाही, माहेरहुन रु. ३,००,०००/– घेऊन ये"’ असे म्हणत होता व इतर गैरअर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ ला भडकावुन अर्जदाराच्या वडीलांनी लग्नात मानपान केला नाही, हुंडा दिला नाही म्हणत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला रात्री झोपु न देता बसुन रहा असे म्हणुन तिला जिवाने मारण्याची धमकी देत होता. गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला

बाहेर जावु देत नाही, तिने बाहेर जाण्याचा प्रयत्न केल्यास तिचे अंगावर कात्री घेऊन मारायला जातो. सदर प्रकार अर्जदाराने इतर गैरअर्जदारांना सांगितला असता त्यांनी तिला धमकावले की, ती वांजोटी असुन माहेरहुन रु. ३,००,०००/– घेऊन येत नाही त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ असे करतो, त्याच्या वागणुकीला अर्जदार ही जबाबदार आहे.

**३.** गैरअर्जदार क्र. १ लग्नाचे सुरुवातीपासुनच अर्जदार हिचे चारित्र्यावर संशय घेवुन तिला अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करतो. तसेच गैरअर्जदार क्र. १ ला दारु पिण्याचे व्यसन आहे. गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे अर्जदाराला नेहमी छिनाल आम्हाला पसंत नव्हती, हिच्या बापाने काहीच हुंडा दिला नाही, आम्हाला तु पाहिजे नाहीस, तुला घरातील कामधंदा येत नाही असे टोमणे मारत असे. गैरअर्जदार क्र. ६ व ७ हया नेहमी गैरअर्जदार क्र. १ च्या घरी येऊन मुक्कामी राहतात व अर्जदार हिचे संसारात हस्तक्षेप करतात. गैरअर्जदार क्र. ६ व ७ या गैरअर्जदार क्र. १ ला भडकावुन म्हणत की, अर्जदार हिला स्वयंपाक येत नाही, दिसायला सुंदर नाही, तिला घटस्फोट दे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला मारहाण करीत असे. गैरअर्जदार क्र. १ ते ४ हे अर्जदारला "तुझया पेक्षा श्रीमंताची मुलगी मिळाली असती आम्हाला तुला सुन करुन काही फायदा झाला नाही"' असे म्हणुन तिचा मानसिक छळ करायचे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे गैरअर्जदार क्र. १ ला भडकावुन देवुन अर्जदाराचे आई वडीलांनी लग्नात हुंडा दिला नाही, तिला तिचे माहेरहुन रु. ३,००,०००/– घेवुन येण्यास सांग, नाहीतर हिला घटस्फोट दे असे म्हणत. अर्जदार हिने तिचे माहेरची परिस्थिती चांगली नसल्यामुळे पैसे आणण्यास नकार दिला असता, गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिला अश्लील शिवीगाळ करुन अमानुषपणे मारहाण करीत होते.

**४.** गैरअर्जदार क्र. ४ चे लग्न गैरअर्जदार क्र. ५ हिचेसोबत झाल्यावर गैरअर्जदार क्र. ५ ही अर्जदार सोबत काही दिवस चांगली वागली. परंतु त्यानंतर ती कारण नसतांना अर्जदारचा राग करत होती व हिला वांजोटी म्हणुन हिणवत होती. गैरअर्जदार क्र. ५ ही गैरअर्जदार क्र. १ ते ४ ला भडकावुन दिल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला मुलबाळ होत नाही व वांजोटी आहे म्हणुन अश्लील शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन घटस्फोटाची करत असे. अर्जदार हिला घुडग्याचा जास्त त्रास झाल्याने गैरअर्जदारांनी तिचा दवाखान्याचा खर्च न करता तिला माहेरी जा असे

धमकावले. त्यामुळे अर्जदार हिने माहेरी येवुन उपचार केले. त्या दरम्यान लॉकडाऊन लागल्याने तिला माहेरी थांबावे लागले. लॉकडाऊन संपल्यावर गैरअर्जदार क्र. १ यास बोलावुन सुध्दा तो अर्जदार हिस नांदण्यास घेऊन जाण्याकरीता आला नाही. म्हणुन अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांना फोन केला, परंतु त्यांनी अर्जदार हिला धमकावले की, रु. ३,००,०००/– घेऊन ये अन्यथा येऊ नकोस त्यामुळे अर्जदार ही स्वतः सासरी गेली. अर्जदार हिला सासरी गेल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ च्या मोबाईलमध्ये दिव्या ठाकुर नावाच्या महिलेसोबत बोलतांनाचे अश्लील मॅसेज व फोटो दिसले, तेव्हा अर्जदार हिला समजले की, गेल्या ४–५ वर्षापासुन गैरअर्जदार क्र. १ चे शेजारी राहणाऱ्या दिव्या ठाकुरसोबत अनैतिक संबंध आहेत. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ ला समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला धमकावले की, ''मैंने दुसरी औरत रख ली है, तु निकल जा यहा से, तेरी जरुरत नही'' असे म्हणुन अश्लील शिवीगाळ करुन घटस्फोटाची मागणी केली. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ च्या अनैतिक संबंधाबाबत सर्व गैरअर्जदारांना सांगितले असता त्यांनी उलट अर्जदार हिला धमकावले की, ''जैसा चल रहा है, वैसा चलने दे, जा रहा है दुसरी औरत के पास तो जाने दे, वैसे भी तुझे बच्चा होता नही और मायके से रु. ३,००,०००/– भी लेकर नही आती'' असे म्हणुन गैरअर्जदार क्र. १ ला घटस्फोट देवुन मोकळे कर व आम्ही त्याचे दुसरे लग्न करुन देतो असे सांगितले. अशा प्रकारे गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. गैरअर्जदारांनी काहीही कारण नसतांना दिनांक २०.०८.२०२३ रोजी अर्जदार हिला मुलबाळ होत नाही व माहेरहुन रु. ३,००,०००/– आणत नाही म्हणुन मारहाण करुन तिचे अंगावरील सर्व दागीने जबरदस्तीने काढुन तिला घराबाहेर हाकलुन दिले. अर्जदारच्या आई वडीलांनी गैरअर्जदारांना अनेकवेळा फोन करुन व गैरअर्जदारांच्या घरी जावुन अर्जदार हिला नांदवण्याची विनंती केली. परंतु गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या आई वडीलांना अश्लील शिवीगाळ करुन धमकावले की, मुलीला नांदवायचे असेल तर रोख रक्कम रु. ३,००,०००/– घेवुन या नाहीतर अर्जदार हिस नांदवणार नाही. त्यामुळे बरेच प्रयत्न करुनही गैरअर्जदार अर्जदार हिल नांदवण्यास तयार नसल्यामुळे अर्जदार नाईलाजाने माहेरी राहत आहे.

५. गैरअर्जदारकडे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे ४ एकर बागायती शेती असुन त्यामधुन वार्षिक रु. ९,००,०००/– ते १०,००,०००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा लाइन फिटिंगचा व्यवसाय करुन दरमहा रु. ३०,०००/– ते रु. ४०,०००/– व वार्षिक रु. ३,००,०००/– ते ४,००,०००/– कमवितो. गैरअर्जदारचे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे स्वतःचे पक्के बांधकाम असलेले तीन मजली घर आहे. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे शेती करुन स्वतःचा उदरनिर्वाह करतात, तसेच गैरअर्जदार क्र. ४ हा नोकरी करुन स्वतःचा उदरनिर्वाह करतो. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ वर अर्जदाराशिवाय कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदारकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नसुन ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. अर्जदार हिला उदरनिर्वाहाकरीता दरमहा रु. १०,०००/– अंतरिम पोटीगी मिळण्याची विनंती तिने केली आहे.

६. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जावर नि. १४ अन्वये त्यांचे म्हणणे दिलेले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध मान्य केले असुन अर्जातील इतर कथने अमान्य केलेली आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या अधिकच्या कथनात म्हटले की, अर्जदार हिने गैरअर्जदारांविरुध्द दाखल केलेला अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या तरतुदींना अनुसरुन नसल्यामुळे, तसेच सदर अर्ज परिस्थिती लपवुन व गैरअर्जदारांना शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या उद्देशाने केला असुन खारिज करण्यात यावा. त्यांचे पुढे कथन की, अर्जदार हिला लग्नामध्ये गैरअर्जदारांनी सोन्या चांदीचे दागीने तसेच मुह दिखाई मध्ये गैरअर्जदार क्र. १ व त्यांच्या आत्याने सोन्याची अंगठी व इतर नातेवाईकांनी नगदी पैसे दिले. लग्नानंतर अर्जदार ही माहेरी आली होती व त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ नांदण्यास घेण्यासाठी आले असतांना अर्जदार हिने सर्व सोन्याचांदीचे दागीने मुद्दाम सोबत घेतले नाही व सासरी गेल्यावर दागीने चोरी गेल्याचे सांगितले. अर्जदार हिला लग्नापुर्वीपासुन हृदयाचा आजार असल्याचे तिचे आईवडीलांनी लपवुन ठेवले. त्यामुळे अर्जदार ही नेहमी आजारी राहत होती व घरातील कामे करण्यास टाळाटाळ करीत होती. अर्जदार हिच्या हृदयाचा आजारासाठी गैरअर्जदार क्र. १ ने बरेच पैसे खर्च केले. अर्जदार तिचे चुलत बहिणीचे लग्न असल्याचे कारण सांगुन माहेरी आली, त्यावेळी ती तीन महिन्याची गर्भवती होती व

गैरअर्जदार क्र. १ च्या माघारी गर्भपात केला. अर्जदार हिला मुलबाळ होत नसल्याने गैरअर्जदार क्र. १ ने बरेचवेळा दवाखान्यात इलाजासाठी पैसे खर्च केले.

**७.** अर्जदार गैरअर्जदारांसोबत नांदत असतांना किरकोळ गोष्टीवरुन वाद करुन त्यांना वाईट बोलुन त्यांचा वारंवार अपमान करीत होती. अर्जदार हिने गैरअर्जदार क. १ ला वेगळे राहण्याची जबरदस्ती केल्यामुळे ते वेगळे राहत होते. अर्जदार गैरअर्जदार क्र. १ ला त्याच्या कुटुंबियांशी बोलु देत नव्हती, त्यांना मदत करु देत नव्हती व वाद करुन मानसिक त्रास देत होती. इतर गैरअर्जदार अर्जदारच्या संपर्कात नव्हते व तिच्यासोबत बोलत नव्हते. त्यामुळे इतर गैरअर्जदारांकडुन अर्जदार हिला कोणताही शारिरीक व मानसिक त्रास नव्हता. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ला नातेवाईक व शेजाऱ्यांसोबत बोलण्यास मनाई करीत होती व शेजाऱ्या सोबत बोलले तर वारंवार वाद करीत होती. अर्जदार गैरअर्जदार क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेवुन वाद करीत होती. अर्जदार हिचा टोंगळा दुखत असल्याने गैरअर्जदार क्र. १ ने तिच्या ईलाजावर बरेच पैसे खर्च केले, परंतु तिला आराम नसल्यामुळे ती तिच्या भावासोबत बाळापुर येथे इलाजा करीता व आरामाकरीता आली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला ईलाजासाठी रु. १५,०००/- दिले होते. तसेच गैरअर्जदार क्र. १ च्या माघारी अर्जदार हिने सर्व सोन्याचांदीचे दागीने व घरातील नगदी रु. २०,०००/- घेवुन माहेरी निघुन आली. लॉकडाऊन झाल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला नांदण्याकरीता येण्याची फोन वरुन विनंती केली असता तिने नकार दिला. तेव्हापासुन अर्जदार ही स्वतःचे मर्जीने कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना व गैरअर्जदारांची कोणतीही चुक नसतांना माहेरी तिचे मर्जीने राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने स्वतः बाळापुरला येवुन नांदण्यास येण्याची विनंती केली तरी तिने नकार दिला. गैरअर्जदारांनी देखील फोन करुन विनंती केली असता अर्जदार हिने नकार दिला. अर्जदार हिच्या भावाने गैरअर्जदार क्र. १ च्या नातेवाईकांना फोनवर दमदाटी करुन त्यांचा अपमान केला व अर्जदार हिला नांदण्यास पाठविण्यास नकार केला. गैरअर्जदार क्र. १ व त्याचे नातेवाईक जेव्हा जेव्हा अर्जदार हिचे माहेरी आले, त्यावेळेस तिने नकार दिला व त्यांना खोटया केसमध्ये फसविण्याच्या धमक्या दिल्या. अर्जदार हिचे भावाने गैरअर्जदार क्र. १ ला ''तु एक टांग से अपाहीज है, मै तेरी दुसरी टांग भी तोड दुंगा'' अशी धमकी दिली. अर्जदार हिने नांदायला यावे म्हणुन

गैरअर्जदार क्र. १ ने होशंगाबाद येथील न्यायालयात दावा दाखल केला. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची कोणीही चुक नसतांना तिचे मर्जीने माहेरी राहत आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार हिला कोणताही शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास दिलेला नसतांना त्यांच्या विरुध्द खोटी केस दाखल केली.

८. गैरअर्जदार क्र. १ हा विकलांग असुन त्याच्या उजव्या पायाला ४६ टक्के विकलांगता असुन तो पुर्वी मजुरीचे काम करत होता, परंतु आता वयोमानामुळे व विकलांगपणामुळे तो दररोज काम करु शकत नाही. एखादे वेळेस कामावर गेल्यास तो दररोज रु. १००/- ते १५०/- कमवितो. सद्यस्थितीत गैरअर्जदार क्र. १ दरमहा केवळ रु. २०००/- कमवितो. गैरअर्जदारकडे कोणतीही शेती व जंगम किंवा स्थावर मालमत्ता नाही. गैरअर्जदार क्र. १ चे आईवडील म्हातारे असुन त्यांना मदत करावी लागते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला पोटगी देण्यास असमर्थ आहे.

९. गैरअर्जदारचे आईवडील, भाऊ व त्याची पत्नी वेगळे राहतात, तसेच गैरअर्जदार क्र. १ च्या बहिणी विवाहीत असुन त्यांच्यापासुन अर्जदार हिला कोणताही त्रास नाही, तरी देखील अर्जदार हिने त्यांच्या विरुध्द हेतुपुरस्परपणे खोटे प्रकरण दाखल केले. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिचा पोटगीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**१०.** अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांचा युक्तिवाद ऐकला.

**११.** उभयपक्षांच्या कथनांच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील प्रश्न विचारार्थ येतात. सदर प्रश्नांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| **अ.नं.** | **प्रश्न** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| **१.** | अर्जदार हिने गैरअर्जदारांकडून तिचा कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे का ? | .. | **अशंतः होकारार्थी** |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | गैरअर्जदार क्र.१ ला उत्पन्नाचे पुरेसे साधन असतानाही त्याने कोणत्याही योग्य कारणाशिवाय अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे किंवा दुर्लक्ष केल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे का ? | .. | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | .. | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>प्रश्न क्र. १ ते ३ बाबत</u> :–**

**१२.** अर्जदार यांचा मुळ अर्ज, निशाणी ३ वरील अंतरीम अर्ज तसेच गैरअर्जदार नि.क्र. १४ वरील म्हणणे पाहता उभयपक्षाने विवाह नाते संबंध इत्यादी बाबी मान्य आहे.

**१३.** अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन सासरहुन हाकलुन दिल्यापासुन ती माहेरी दुःखी व कष्टदायक जीवन जगत असुन ती तिच्या जिवनावश्यक मुलभुत गरजा भागवण्यास असमर्थ आहे. अर्जदाराला उत्पन्नाचे स्वतंत्र कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदाराचे म्हणणे की, गैरअर्जदारकडे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे ४ एकर बागायती शेती असुन त्यामधुन वार्षिक रु. ९,००,०००/– ते १०,००,०००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा लाइन फिटिंगचा व्यवसाय करुन दरमहा रु. ३०,०००/– ते रु. ४०,०००/– व वार्षिक रु. ३,००,०००/– ते ४,००,०००/–कमवितो. गैरअर्जदारचे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे स्वतःचे पक्के बांधकाम असलेले तीन मजली घर आहे. अर्जदाराने नि.क्र. ४ वर तिच्या उत्पन्नाबाबत मालमत्ता आणि दायित्व प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार यांचे राहणीमान, जिवनावश्यक वस्तुंचा दर, गरजा पाहता या अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिने अर्जदारला दरमहा रु. १०,०००/– अंतरिम पोटगी देण्याबाबत व घरभाडे दरमहा रु. ५,०००/– मिळण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

१४. गैरअर्जदार यांनी त्यांचे कथनात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी कोणताही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. अर्जदार ही स्वतःहुन विनाकारण माहेरी राहत असुन गैरअर्जदार क्र. १ चे वैवाहिक जिवन उध्वस्त केले आहे. गैरअर्जदारांना फक्त त्रास देण्याच्या हेतुने खोटा अर्ज दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १९ वर दाखल केले.

१५. वर नमुद केल्याप्रमाणे उभयपक्षांमधील नातेसंबंध मान्य असल्याने अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर विवाहाची पत्नी आहे. अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य असल्यामुळे अर्जदाराची पालन पोषणाची, उदरभरणाची सर्वस्वी कायदेशीर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ याची आहे.

१६. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदारांनी तिला शारिरीक व मानसिक छळ केल्याचे कथन केलेले आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात अंतरिम अर्ज निकाली करतांना अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे किंवा नाही त्या करीता सबळ पुराव्याची आवश्यकता नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चा मुख्य उद्देश कौटुंबिक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण करणे होय व सदर तरतुदीनुसार कोणतीही एका छता खाली राहणारी व्यथित व्यक्तीवर कौटुंबिक हिंसाचार झालेला असल्यास अर्ज करु शकते. त्यामुळे या ठिकाणी अर्जदारावर सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे किंवा नाही बाब पाहावी लागेल. अर्जदार हिने तिच्या वाद कथनामधील मजकुर शपथेवर सांगितलेला असल्याने प्रथमदर्शनी गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येते.

१७. अर्जदाराचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र पाहिल्यास असे दिसून येते की, अर्जदाराचे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे व तिचा मासिक खर्च रु. १०,०००/– आहे. प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारकडे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे ४ एकर बागायती शेती असुन त्यामधुन वार्षिक रु. ९,००,०००/– ते १०,००,०००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा लाइन फिटिंगचा व्यवसाय करुन दरमहा रु. ३०,०००/– ते रु. ४०,०००/– व वार्षिक रु. ३,००,०००/– ते ४,००,०००/–कमवितो. गैरअर्जदारचे मौजा रसुलीया, होशंगाबाद

(मध्यप्रदेश) येथे स्वतःचे पक्के बांधकाम असलेले तीन मजली घर आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ यांनी मालमत्ता दायित्व प्रतिज्ञापत्र नि.क्र. १९ वर दाखल केले असुन त्यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रात अर्जदार हिने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिलाई कामाचा कोर्स केला असुन महिलांचे व लहान मुलांचे कपडे शिलाईचे कामातुन दररोज रु. ३००/– कमवित असल्याचे कथन केलेले आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी जबाबात अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या उत्पन्नाच्या साधनाबाबतचा मजकुर अमान्य केलेला आहे. गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार ही स्वतःहुन माहेरी निघुन गेलेली आहे.

१८. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनात गैरअर्जदारकडे मौजा रसुलीया, होशंगाबाद (मध्यप्रदेश) येथे ४ एकर बागायती शेती असुन त्यामधुन वार्षिक रु. ९,००,०००/– ते १०,००,०००/– कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा लाइन फिटिंगचा व्यवसाय करुन दरमहा रु. ३०,०००/– ते रु. ४०,०००/– व वार्षिक रु. ३,००,०००/– ते ४,००,०००/– कमवितो असे कथन केलेले आहे. परंतु त्या करिता अर्जदार हिने कोणताही दस्तावेज दाखल केला नाही. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर शब्दाशिवाय कोणताही पुरावा नाही. याविरुध्द अर्जदार शिलाई काम करुन दररोज रु. ३००/– कमविते या करीता देखील गैरअर्जदारांनी कोणताही दस्त दाखल केलेला नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील व्यथित व्यक्तीच्या संज्ञेत अर्जदार ही येत असुन सदर अधिनियमाच्या उद्देशानुसार व्यथित व्यक्तीला त्वरित संरक्षण दिले गेले पाहिजे. सदर उद्देश लक्षात घेता अर्जदार हिने गैरअर्जदारांच्या उत्पन्नाबाबत कोणताही दस्त दाखल केला नसला तरी गैरअर्जदार क्र.१ त्याच्या अर्जदाराप्रती असलेल्या जबाबदारीतून मुक्त होवू शकत नाही. परंतु गैरअर्जदाराने अभिलेखावर गैरअर्जदार क्र. १ विकलांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे, त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ शारिरीक दृष्टया सुदृढ व्यक्ती नाही. त्यामुळे अंतरिम पोटगीची रक्कम ठरवतांना सदर बाब विचारात घ्यावी लागेल.

१९. अर्जदारच्या जिवनावश्यक तसेच वैद्यकीय खर्चासह दरमहा खर्च व गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाचा विचार करता या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदार

क्र.१ यांनी अर्जदार हिला रु. २०००/– व घर भाडेसाठी रु. १०००/– अशी एकुण दरमहा रु. ३०००/– एकत्रित अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. अर्जदारच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अर्जदार हिने लग्नातील सोन्याचे दागीने, भेटवस्तु व संसारपयोगी वस्तु गैरअर्जदार यांचे कडुन परत मिळावे अशी मागणी केली आहे. परंतु सदरचे कथन गैरअर्जदार यांनी अमान्य केलेले आहे. सोने, चांदीचे दागीने, आंदण व भेटवस्तु गैरअर्जदार यांच्याकडे असल्याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल नाही. त्यामुळे अर्जदाराच्या सदर मागणीवर या टप्पयावर आदेश करणे संयुक्तिक होणार नाही. वरील सर्व परिस्थिती विचारात घेता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'अंशतः होकारार्थी' देऊन पुढील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

| | |
|---|---|
| (१) | अर्ज नि.क्र. ३ अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| (२) | गैरअर्जदार क्र. १ याने अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतीम निकालापर्यंत अर्जदार हिला घरभाडयासह एकत्रित दरमहा रु.३०००/– (रुपये तीन हजार मात्र) इतकी अंतरिम पोटगी द्यावी. |
| (३) | सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी. |
| (४) | गैरअर्जदार क्र. १ याने अंतरिम पोटगी देण्यास कसुर केल्यास अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम ३१ अन्वये कार्यवाही करण्याची मुभा राहील. |

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.11.14 17:44:08 +0530

दिनांक : १४/११/२०२५
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 14/11/2025 |
| Order signed by P.O on | :- | 14/11/2025 |
| Order uploaded on | :- | 14/11/2025 |